मुख्य कार्यालय ,विरार (प)
ई-मेल:vasaivirarcorp oration@yahoo.com
ता.वसई जि.पालघर ४०१३०३

अग्निशमन व आपत्कालीन सेवा
भ्रमणध्वनी क्र.९८२२३२१६८४
ई-मेल : fire.vvmc@gov.in
जा.क्र. वविशम/अग्नि/मुका/३८३३ /२०२५
दिनांक:- ११/०३/२०२५

## ना हरकत दाखला

अग्निशमन दल

प्रति,
मे. कोकण एज्युकेशन ॲण्ड मेडिकल ट्रस्टचे विरार
होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल,
पहिला मजला,मंदारेश्वर गणपती मंदिर समोर,
वीर सावरकर रोड, विरार (पूर्व) ता.वसई जि.पालघर

**संदर्भ:-**
१) मे.कोकण एज्युकेशन ॲण्ड मेडिकल ट्रस्टचे विरार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, यांचा दि. २४/०२/२०२५ रोजीचा अर्ज.
२) नोंदणीकृत अनुज्ञप्तीधारक अभिकरणाच्या परवानाची प्रत.
३) नोंदणीकृत अनुज्ञप्तीधारक अभिकरणाकडून प्राप्त झालेला दाखला.
४) अग्निशमन यंत्रणेचे रंगीत छायाचित्र.
५) उपलब्ध अग्निशमन यंत्रणेचे आय.एस.आय.प्रमाणपत्र.
६) टॅक्स पावती
७) प्रदुषण प्रमाणपत्र.
८) अंतर्गत रचना केलेला नकाशा .
९) व्यवसाय ठिकाणाचा नकाशा.
१०) विज संच मांडणीचे वीज परिक्षण कलेले प्रमाणपत्र.
११) अग्निशमन यंत्रणा वापरात असल्या बाबतचे हमी पत्र.
१२) एअर कंडिशन्ड (वाताणुकुलीत यंत्रणा) देखभाल दुरुस्तीचे प्रमाणपत्र.
१३) इमारतीचे स्ट्रक्चरल स्टॅबीलिटी प्रमाणपत्र.
१४) अग्निशमन विभागाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी दि.२४/०२/२०२५.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात, अग्निशमन विभागात सादर केलेल्या अर्जानुसार " मे. कोकण एज्युकेशन ॲण्ड मेडिकल ट्रस्टचे विरार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, " (४३५ चौ.मी.) नावाने सुरू केलेल्या व्यवसायाच्या ठिकाणी करावयाची अग्निसुरक्षा व्यवस्था व सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने घ्यावयाच्या खबरदारीचे अनुषंगाने अग्निशमन यंत्रणेची तपासणी करुन या विभागाच्या खालील शर्ती व अटींची पूर्तता करण्याचे अधिन राहून **केवळ दिलेल्या तारखेपासुन फक्त १ वर्ष** कालावधीसाठीच **अग्निशमन तांत्रिक अभिप्राय देण्यात येत असुन तद्नंतर नुतनीकरण करणे बंधनकारक राहील.**

"महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६" अन्वये अधिनियमाच्या कलम ३ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे इमारतीमधील आग प्रतिबंधक जीवसंरक्षक उपाययोजना सदैव कार्यान्वीत ठेवणे आपणास बंधनकारक आहे. कलम ३ (३) नुसार सदर यंत्रणा सदैव सुरक्षित व कार्यक्षम ठेवणे बंधनकारक आहे.

१. व्यवसाय इमारतीत जीना, पॅसेज इत्यादी भाग जसे आता मोकळे आहेत. तसे ते कायम स्वरूपी मोकळे राहतील याची दक्षता घ्यावी.
२. व्यवसायस्थळी बाहेर पडण्याचे मार्ग चिन्हाने दर्शविण्यात आलेले आहेत तसे ते कायम स्वरूपी दिसतील याची खबरदारी घ्यावी.
३. व्यवसायस्थळी सद्या करण्यात आलेली विद्युत व्यवस्था सदैव सुस्थितीत राहील याची खबरदारी घेण्यात यावी.
४. व्यवसायस्थळी आवश्यकतेनुसार अधिक विद्युत व्यवस्था करावयाची असल्यास ती स्पार्कप्रुफ व आपोआप खंडीत होणारी असावी व ती आय.एस.आय. मार्क प्रमाणित साहित्याने परिपुर्ण असावी. तसेच मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदारांकडून करून घेऊन ती पुर्णतः सुरक्षित असल्याचे प्रमाणपत्र घ्यावे.
५. दोन रूग्णांच्या मध्ये पार्टीशनचे पडदे आग प्रतिरोधक साहित्याचे (Fire Retardant Material) बसविण्यात आले आहेत ते सदैव तश्याच प्रकारचे असावेत. याची खबरदारी घेण्यात यावी.

६. व्यवसाय ठिकाणी फिक्स फायर फायटींग सिस्टम, एबीसी टाईप (६ की.) ०६ नग, सि ओ टू टाईप-४.५ कि.१ व बारीक वाळुने भरलेल्या बादल्या ठेवण्यात आलेले आहेत ते सदैव कार्यान्वित ठेवणे तसेच कालानुरूप रिफिलिंग करणे आपणांस बंधनकारक आहे.

७. व्यवसाय संबंधित व्यक्ती, कर्मचारी अथवा स्वयंसेवक यांना आग विझविणे, रूग्णांना त्वरीत व सुरक्षितपणे बाहेर काढणे, अग्निशमन उपकरणांचा वापर याबाबत किमान प्राथमिक माहिती असावी. वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात यावे. महिन्यातून एकदा मॉक ड्रिल घेण्यात यावी व त्याच्या नोंदी जतन कराव्यात.

८. इमारतीत सध्या असलेली पुरेशी वायुव्हिजन व्यवस्था (व्हेंन्टीलेशन) व पर्यायी पोर्टेबल इमरजंन्सी लाईटची व्यवस्था कायम स्वरूपी उपलब्ध राहील याकडे काटेकोरपणे लक्ष देणे बंधनकारक आहे.

९. व्यवसायस्थळी इमारतीमध्ये अत्यावश्यक सेवेचे दुरध्वनी क्रमांक जसे फायर ब्रिगेड, पोलीस, दवाखाना इत्यादींचे ठळक अक्षरात दर्शनी भागात दर्शविण्यात यावे ते कायमस्वरूपी दिसतील असे पहावे.

१०. प्रत्येक मजल्यावर असलेली हस्तचलीत इलेक्ट्रिक भयसुचना यंत्रणा सदैव कार्यान्वित ठेवावी.

११. इमारतीमधील अग्निसुरक्षा व्यवस्था यंत्रणेची स्थिती केव्हाही तपासणी करण्याचे अधिकार संबंधित अग्निशमन अधिकारी यांचेकडे राहतील.

१२. रूग्णालयातील कार्यरत सर्व संबंधित कर्मचाऱ्यांनी, नोंदनीकृत अनुज्ञप्तिधारक व अग्निशमन कर्मचारी यांचे मदतीने वर्षातुन किमान एक मॉक ड्रिल करून घेणे बंधनकारक राहील.

१३. व्यवसायामुळे निर्माण होणाऱ्या टाकाऊ पदार्थाची, सांडपाण्याची योग्य ती व्हिलेवाट लावावी, अशा पदार्थामुळे मानवी जीवन व पर्यावरण यांना हानी पोहोचणार नाही याची दक्षता घ्यावी.

१४. वसई विरार शहर महानगरपालिकेचे अनधिकृत बांधकाम कारवाईस बाधा न येता फक्त अग्निशमन बाबींसाठी ना हरकत दाखला/अभिप्राय देण्यात येत आहे.

१५. नविन बांधकामासाठी वापर परवाना घेणेपुर्वी कॅपीटेशन फी/कर भरणे बंधनकारक आहे.

१६. प्रत्यक्ष व्यवसाय सुरु करणेपुर्वी सर्व प्रकारच्या शासकीय, निमशासकीय व इतर परवानग्या संबंधित कार्यालयाकडून घेण्यात याव्यात. हा ना हरकत दाखला/अभिप्राय कुठल्याही प्रकारचा पुरावा म्हणुन वापरण्यात येऊ नये. असे केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

१७. व्यवसायसंबंधी कुठल्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास, सर्व प्रकारचे तक्रारींचे निरसन (खुलासा) करण्याची जबाबदारी अर्जदार व्यावसायिकांवर राहील, याबाबत अग्निशमन विभाग जबाबदार राहणार नाही.

१८. ना हरकत दाखल्याचे नुतनीकरण वेळोवेळी शासन निर्णयांत होणारे बदल व फी वाढ भरणा बंधनकारक राहील.

**१९. सदरहू अग्निशमन तांत्रिक अभिप्राय निर्गमीत केल्याच्या दिनांकापासून फक्त ०१ वर्ष कालावधीसाठीच वैध राहील. तद्नंतर अग्निशमन तांत्रिक अभिप्राय नुतनीकरण करताना त्या त्या वेळी अस्तीत्वात असलेली अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित ठेवणे आपणांवर बंधनकारक असेल. तसेच या संदर्भाने जर काही दुर्घटना घडल्यास त्यास सर्वस्वी मालक/भोगवटादार जबाबदार राहील.**

२०. सदर नाहरकत दाखल्याची मुदत संपण्यापुर्वी किमान एक महिना आधी आपण दाखला नुतणीकरण करणेसाठी अर्ज कागदपत्रांसह इकडील कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. दाखल्याची मुदत संपल्यानंतर सदर दाखला रद्द झाला आहे असे मानन्यात येईल.

२१. जर काही दुर्घटना घडून वित्त वा जिवीत हानी झाल्यास त्या संदर्भात आपणांवर फौजदारी गुन्हा दाखल होण्यास आपण पात्र असाल याची नोंद घेण्यात यावी.

२२. दाखला फी रू.५०००/- पावती क्रमांक १५९५८७, पुस्तक क्रमांक.१५९६,(डि.डि.००३५९६, वसई विकास सहकारी बँक लि.), दि.२७/०२/२०२५ रोजीचा भरणा.

२३. मालक/भोगवटादार यांनी दरवर्षी जानेवारी व जुलै महिन्यात लायसन्स प्राप्त अभिकरणाकडुन अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत कार्यरत असले बाबत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. यासाठी आपणांस वेगळे मागणी पत्रक देण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

२४. नोंदणीकृत अनुज्ञप्तिधारकांची यादी www.maharastrafireservice.org किंवा www.mfsindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका